● प्रकाशक : श्री. श्री. वि. सहस्रबुध्दे
१९५४, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

● मुद्रक : श्री. जोशी
आनंद मुद्रणालय, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

● फोटो टाईपसेटींग : कल्पक ग्राफिक्स
१३३०, सदाशिव पेठ, निखिल चेंबर्स, पुणे - ४११ ०३०.

● प्रकाशन दिनांक : निज वैशाख व।। ५ शके १९१३
२ जून १९९१

● प्राप्तीस्थळ : १) श्री. चंद्रशेखर राम केळकर
श्रीराम निकेतन, ८२७, गांवभाग, सांगली - ४१६ ४१६.
२) श्री. श्री. वि. सहस्रबुध्दे
१९५४, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

।। श्री ।।



सद्गुरु
श्री. निंबरगोकर महाराज



सद्गुरु
श्री. दासराम महाराज

# - मनोगत -

चिमड संप्रदाय हा सिध्द संप्रदायच होय. भगवान शंकर म्हणजे आदिनाथांचे अवतार. रेवणसिध्द, त्यांचे शिष्य मरुळसिध्द आणि त्यांचे शिष्य काडसिध्द. काडसिध्दांनी श्रीनिंबरगीकर महाराज यांना उपदेश दीक्षा दिली. श्रीनिंबरगीकर महाराजांचे शिष्य श्रीरघुनाथप्रिय तथा साधुमहाराज. त्यांचे शिष्य श्रीरामभाऊ महाराज यरगट्टीकर म्हणजे चिमडमहाराज. त्यामुळे येथुन पुढे हा संप्रदाय चिमड संप्रदाय या नांवाने ओळखला जाऊ लागला. या चिमड महाराजांचे शिष्य सांगलीचे श्रीतात्यासाहेब महाराज कोटनीस. यांनीं साधनेबरोबरच सांगलीमध्ये अखंड पंचवीस वर्षे कीर्तन केले. त्यांच्या पश्चात त्यांचे शिष्य श्रीमामा महाराज केळकर यांनीही साधना करून सतत अडतीस वर्षे - एकही दिवस खंड न पडता अखंड कीर्तन केले.

श्रीमामा महाराज केळकर यांचे चिरंजीव म्हणजे श्रीदासराम महाराज तथा श्रीदादा. श्रीतात्यासाहेब महाराज यांनी श्रीदादांना चौदाव्या दिवशीच दृष्टीव्दारा अनुग्रह दिला. श्रीदादा वयाच्या पाचव्या वर्षापासूनच कीर्तन करीत आहेत. ‘तैसी दशेची वाट न पाहता । वयसेचिया गांवा न येता । बालपणीच सर्वज्ञता । वरि तयाते।। ’ या श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या ओवीचा साक्षात प्रत्यय देणारी श्रीदादांची कीर्तने असतात. श्रीनिंबरगीकर महाराजांकडून श्रीदादांना जी पदे ऐकू आली ती ‘श्रीगुरुलिंगगीता’ म्हणून प्रसिध्द झाली आहेत. ‘श्रीज्ञानदेव तेहत्तिशी’वर श्रीदादांनी ओवीबध्द टीका लिहीली आहे. श्रीदादांच्या अभंगांची गाथाही ‘दासराम-गाथा’ म्हणून प्रसिध्द झाली आहे.

श्रीमामा महाराजांच्या निर्याणाच्या दुसऱ्या दिवसापासून श्रीदादांनी अखंड कीर्तनाची परंपरा चालू ठेवली आहे. सुखदुःखाचा कोणताही प्रसंग श्रीदादांच्या कीर्तनाच्या आड येऊ शकत नाही. याची साक्ष अनेकांनी पाहिली आहे. श्रीदादांचे कीर्तन म्हणजे साधकांना पर्वणीच असते. कीर्तनप्रसंगी श्रीदादांचे मनन, चिंतन आणि मार्गदर्शन गद्य पद्य स्वरुपात प्रकट होत असते. पदांच्या आकर्षक चाली, नर्म विनोद आणि विलक्षण पाठांतर या बहिरंगाबरोबर श्रीदादांचे अंतरंगही खुले होत असते. नाम स्मरणाची महती आणि आत्मज्ञानाची अनुभूति यांचा प्रत्यय श्रोत्यांना अंतर्मुख करणारा व साधनेला प्रवृत्त करणारा असतो. 'चित्त चैतन्यी समरसत । देह प्रपंची वर्तत।। ' या ओवीत श्रीदादांचे वर्णन सर्वार्थानि करता येईल.

मातृपितृभक्ति आणि गुरुभक्ति यांचा आदर्श म्हणचे आमचे श्रीदादा. श्रीनिंबरगीकर महाराज, श्रीतात्यासाहेब महाराज आणि पितृदेव श्रीमामा यांच्या नुसत्या स्मरणाने श्रीदादांच्या डोळ्यातून आनंदाश्रु पाझरतात. चिमड संप्रदायातील विद्यमान श्रेष्ठ पुरुष म्हणून श्रीदादांना फार मोठे आदराचे स्थान लाभले आहे.

श्रीदादांच्या तोंडून गुरुमहिमा नित्यकीर्तनात ऐकावयास मिळतो. तथापि ज्यांना या श्रवणाची संधि मिळत नाही अशा साधकांची सोय करता आली तर पहावी या हेतूने श्रीदादांना गुरुमहिमापर कांही लिहीण्याची विनंती केली. तेव्हां श्रीदादांनी गुरुमहिमा विशद करणाऱ्या कांही ओव्याच उत्स्फूर्तपणे सांगितल्या. त्या ओव्या प्रसिध्द करण्याची अनुमतिही दिली हे आपणा सर्वांचे भाग्य आहे. श्रीदादांचा हा प्रसाद वाचकांच्या हाती देतांना अतिशय आनंद होत आहे. सांगलीचे प्रा. डॉ. के.वा. आपटे यांचे या कामी बहुमोल साह्य लाभले. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करतो. मुद्रक श्री. जोशी यांनीही आपलेपणाने सहकार्य केले त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद.

प्रकाशक

॥ श्री राम॥

## - श्री गुरु महिमा -

**गुरु म्हणिजे गुप्त । जे का नव्हेची संतप्त । परी सकळा अलिप्त । सर्वदाही ॥ १॥ गुरु कृपा करी । तया कोण मारी । गुरु जैं संहारी । कोण रक्षी ॥ २॥ गुरु हाचि त्राता । गुरु हाची माता । गुरुचि देवता । सर्वसाक्षी ॥ ३॥ गुरु हाचि साक्षिभूत । सकळ भूतांचे भूत । म्हणोनिया अत्यद्भूत । वृत्ति त्यांची ॥ ४॥ गुरु न दावी चमत्कृति । परी ते दाविती कृति । कृति जे निववी विकृति । नोहेचि पै ॥ ५॥ गुरु माना सहोदर । गुरुनाम हेचि सार । जे नोहेचि असार । सार-रूप ॥ ६॥ गुरु घाली डोळिया अंजन । गुरु तोचि निरंजन । म्हणोनि जगी परिपूर्ण । सारभूत ॥ ७॥ गुरुकृपा जहालियावरी । परिपूर्ण सृष्टि सारी । साधक विचारी । अविचारी नव्हेचि ॥ ८॥ गुरुभाषा संस्कृत । कदापि नव्हे प्राकृत । आणि तेचि अविकृत । सर्वां ठाईं ॥ ९॥ तरी ठाय तो कवण । विचारे पहावे आपण । पुण्यसंचय यत्र पूर्ण । नासापुटी ॥ १०॥ पुटी जाणावी त्रिपुटी । जेथे नुरेचि त्रिपुटी । साधके न व्हावे कष्टी । साधनात ॥ ११॥ तरी साधक तो कोण ।**

षड्विकार नुरी आपण । ऐसे हे विंदान । साधकाचे ।। १२।। साधक साधी साधन ।
साध्य साधक नव्हे दोन । हे जाणावे आपण । साधनातू ।। १३।। तया म्हणावे साधक ।
जो कोणा न बाधक । कळिकाळाचा धाक नाही जया ।। १४।। जया सर्वत्र विजय ।
कदा नव्हे पराजय । जेथे संतुष्ट जयाजय । मनोजय ।। १५।। साधिलिया मनोजय ।
तया सर्वत्र विजय । परी हा जो विजय । कैसा व्हावा ।। १६।। मना आधीन न होये ।
नामेचि पावे रुपा ये । जेथे काही अपाये । होतीच ना ।। १७।। जेथे भवती ना भवती ।
मग कैची अभवती । जया ठायी परा भक्ती । चौ देहापैल ।। १८।। विषय इंद्रिये
ओळखती । तोचि लाभेल या मुक्ती । जेणे होईल विरक्ति । तार्किकांची ।। १९।।
चैतन्यप्रवण वृत्ति । संतीं सांगितली युक्ति । जेथ नुरेचि आसक्ति । भवबंधाची ।। २०।।
पसरी भवबंध कैसा । संती सांगितला सुगमसा । तोचि जाणावा आपैसा ।
भाविकांनी ।। २१।। तरी तो भाविक कोण । ऐसा येथे आला प्रश्न । म्हणोनी त्याचेच
विवरण । पाहू आधी ।। २२।। म्हणोनि जाणावे आधी । जेथे नुरेचि उपाधि । मग नुठे
मूळ व्याधि । सर्वथाही ।। २३।। म्हणोनि जाणावे मूळ । आपुले स्वरुप केवळ । जेणे
योगे विमल । ज्ञान होय ।। २४।। जे का आपुले स्वरूप । तेचि जाणिजे मूळ रूप । जे का

अरूपाचे रूप । प्रत्ययकारी ।। २५।। तरी कोण तो प्रत्यय । जेथे न येचि व्यत्यय । या
नामेचि विजय । प्राप्त होये ।। २६।। व्याकरणी विभक्ति प्रत्यय । गेल्या नामे ये प्रत्यय ।
जया ठायी व्यत्यय । नुरेचि गा ।। २७।। तरी ते कोणते नाम । साधक गाठे आत्मधाम ।
जेथे बैसका आराम । सहजेचि ।। २८।। तरी कोणता आराम । जेथे नुरेचि विराम ।
सदा म्हणे राम राम । राम रामी ।। २९।। सदा जपे रामनाम । जेणे भेटे स्वतः राम । सर्वा
भूतीं सम । पाहोनिया ।। ३०।। ज्याला पाश्चात्य म्हणती ईथर । त्यासी पहाणे वदनी
संतवर । जेणे योगे रमावर । वश होये ।। ३१।। हे नव्हे वशीकरण । परी नाम-जप-यज्ञ ।
समर्पित जीवन । होताचि पै ।। ३२।। हे साधावया लागून । करावा लागे प्रयत्न । यत्न
हाचि देव पूर्ण । समर्थ म्हणती ।। ३३।। कर्तुं अकर्तुं समर्थ । म्हणोनि जे समर्थ । ज्यांचे
कृपे भावार्थ । ज्ञान होये ।। ३४।। तरी कोणा म्हणावे समर्थ । कदा न होती असमर्थ ।
तरी भाविका किमर्थ । शंका ये ।। ३५।। तरी शंका आणि अशंका । भाविकापुढे
येतील का । जये ठायी तार्किका । वाव नाही ।। ३६।। तर्कटी ते तार्किक । मामा
कीर्तनी सांगती चोख । निरुत्तर होती लोक । अहेतुकपणे ।। ३७।। पणाने पण लाविता ।
साधनसिध्दि ये हाता । नाम जीवनी मुरता । लाभ होये ।। ३८।। तरी कोणा म्हणावे
लाभ । जेथे न पवे अलाभ । जो देखी लाभालाभ । स्वाभाविक ।। ३९ ।।

भेटे भगवंत ॥४०॥ कोणा
स्थितिस्थापकता । जाणावि निरुता । जेणे योगे भक्ता । भेटे भगवंत ॥४०॥ कोणा म्हणावे भक्त । जो नव्हेची विभक्त । परी गुंतला नामात । सदैव जो ॥४१॥ तरी कोणा म्हणावे दैव । जो न कदा निर्दैव । जया मागुता देव । उभा राहे ॥४२॥ जो का अखंड राहे । तयासीच म्हणती पाहे वेगळेपणे प्रत्यये । येईच ना ॥४३॥ तरी येणे जाणावे । मग येतील अनुभवे । येणे जाणेचे नावे । शून्याकार ॥४४॥ नातरी येणे ते कवण । जाणे ते कवण । कवणा म्हणावे नेणपण । प्रश्न उभा ॥४५॥ उभेचि का रहावे । बसता काय हानि होये । प्रश्न उभारिला समये । अगांतुक ॥४६॥ कवणा म्हणावे समय । जेणे भक्तासी ये प्रत्यय । आनंदोनि अनुभवे । अनुभवी जो ॥४७॥ जये ठायी मन मुरे । आणि मागुती काही उरे । ते तू सोपा रे । का न सेवीसी ॥४८॥ तरी सेवा ते कवण । याची घेयावी जाण । या बोलण्याचे प्रमाण । पहावे गा ॥४९॥ तरी आत्मा केवी जाणणे । आकाशा सरिसा देखणे । आकाश होऊनि चिंतणे । आकाश ब्रह्म ॥५०॥ तरी आकाश ते कवण । हे घेयावी जी जाणून । जेणे समाधान । तार्किकाही ॥५१॥ कोणा म्हणावे तार्किक । जे का पहाती लौकिक । जया नेणवे अलौकिक । कदापिही ॥५२॥ कोणा म्हणावे कदापि । जो सर्वदा व्यापी । आणि व्यापेचि संतापी । सहजपणे ॥५३॥ तरी कवणा म्हणावे सहज । पैलतीरा ने जहाज ।

आत्मानुभव अविभाज्य । भोगील जो ॥५४॥ प्राणैव नाम । जेणे भेटी मेघश्याम । साधका विश्राम । सहजे ॥५५॥ श्वासामाजी जे स्पंदन । तया लागी म्हणती प्राण । जेणे देह दृश्याभान । उरेचिना ॥५६॥ सोहमस्मीचे छंदे । वेधू लाविला गोविंदे । साधकु स्वानंदे । डोलतसे ॥५७॥ जेथे नामाची अस्मिता । जे सर्वदा स्मिता । आत्माचिया आत्मा । वश केले ॥५८॥ म्हणोनि प्रणवैक नाम । नाम तेचि ब्रह्म । जेथे न बा ये कर्माकर्म । नारायणे सांगितले ॥५९॥ आंत घेई तो प्राण । बाहेरी धावे तो अपान । आत्मलाभा शमन । सहज होणे ॥६०॥ तोचि जाणावा शकुन । जो न करी अपशकुन । जया भेटे भगवान । अंतर्यामी ॥६१॥ चित्तचतुष्टय पूर्ण । जे स्वामी दाविती आपण । जेणे परमात्मा आपण । वश होय साधका ॥६२॥ सहासी जो मारी धका । आणि मनासी दे धका । पदरी घेतला एका । सोहंकारे ॥६३॥ धरिता सो टाकिता हं । अखंड चाल सोहं सोहं । हेचि घ्यावे जी वर्म । समर्थपणे ॥६४॥ नामाचा लागता छंद । सहजे नुरे भवबंध । मनेचि होय उद्बोध । भाविकासी ॥६५॥ भावधरी जो आपण । तयासी म्हणती भाविक जाण । भाविकासी धन्य । देवभेटे ॥६६॥ रामकृष्ण वाचा । भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा । रामजप ॥६७॥ वन्ही तेथे धूर । धूर तेथे अंगार । हे जाणिजे व्यग्र । गुरुकृपे ॥६८॥ कृ करणे पा पालन । हे तो

गुरुकृपेचि खूण । कीर्तनी सांगती आपण । पितृदेव ।। ६९।। देव तो प्रकाशमान ।
सातत्येसी प्रमाण । जरी लोक म्हणती पाषाण । तरी तो देव ।। ७०।। ज्ञानदेव म्हणे भजा
आत्मदेवा । नामस्मरणेचि होय सेवा । तेचि पावे देवदेवा । अखंडित ।। ७१ ।।
ज्ञानदेवाचिया कृपा । मामांचा परमार्थ सोपा । परि नव्हती गबाळ्याच्या गप्पा ।
निश्चयेसी ।। ७२ ।। जये ठायी नव्हे स्वार्थ । त्यासी बोलती परमार्थ । अनुभव घेती
साधुसंत । सहजेचि ।। ७३।। सकार आणि हकार । याचा जाण पा प्रकार । मन होय
निर्विकार । अनुभवे ।। ७४।। अनुभवी या जो आपण । त्याचा अनुभव घेता जाण ।
अनुभवे विज्ञान । आकळे गा ।। ७५।। तरी कवण आकलन । जेणे आत्मयाचे ज्ञान ।
आणि विज्ञाने आपण । पडे ठायी ।। ७६।। ठाय अंतरा ठेका । हे गायकीचे शब्द देखा ।
जरी गायत्री आली मुखा । तरी कळे ।। ७७।। कळ कळता आकलन । देव भेटी दे
आपण । हेचि विज्ञान । संतांचे गा ।। ७८।। सोहमस्मीचे छंदे । परिपूर्ण हो विनोदे ।
श्री गुरुचे आशीर्वादे । परमार्थ पूर्ण ।। ७९ ।। विज्ञानखूण आसती ठेली । तेणे
साधकासी साऊली । आणि गातसे गाऊली । प्रबोधे गा ।। ८० ।। बोधी बोधिले
बोधिता । सहजे पावती ऐक्यता । आणि सदैव बोधामृता । माजी डुंबती ।। ८१।। हे तो
बोधामृत । प्राशिताती साधुसंत । होवोनि कृतार्थ । बोध करीती ।। ८२।। भगवान्

निंबरगी महाराज । आणि तात्यामहाराज । बोधाचे सहज । महत्त्व दाविती ।। ८३।।
जयामाजी नामतत्व । जगी त्याचेच महत्त्व । ऐसे हे ऐक तत्व । मामा म्हणती ।। ८४।।
मामा म्हणजे आमुचे मामा । त्यांचा रामनाम प्रेमा । तयासी उपमा । काय द्यावी ।। ८५।।
गुप्तरुप दावी गुरु । म्हणोनिया तो श्रीसद्गुरु । जेणे होये पर पारु । साधकू तो ।। ८६।।
गुरु हा प्राणांची विश्रांती । गुरु हा वासनेची शांती । गुरु हा तो आत्मतृप्ती ।
साधकासी ।। ८७।। गुरुवीण नाही देव । तो संतांत महानुभाव । साधकासी सापडे ठाव ।
गुरुचरणाचा ।। ८८।। जे त्रैलोक्यी नाही दान । ते करती संतसज्जन । पाहे आपणा
आपण । साधकु तो ।। ८९।। गुरु सागर सुखाचा । गुरु आगर प्रेमाचा । गुरु भक्तोतम
आमुचा । सर्वश्रेष्ठ ।। ९०।। गुरु सांगे तो ग्रंथ । ऐका वाणी भावयुक्त । साधकू तो होये
मुक्त । गुरुकृपे ।। ९१ ।। साधकासी साह्य गुरु । म्हणोनी तो जगद्गुरु । ठेवीतसे
कृपा-करु । माथया जी ।। ९२।। गुरु साधकासी माय । भक्तालागी करी साहाय्य ।
जेणे नुरेची अपाय । कोणताही ।। ९३।। भक्ता दुभे कामधेनु । जेणे निवे तनु-मनु ।
तैसेचि पंचप्राण । निवताती ।। ९४।। भक्तीचे मंडण गुरु । माथा ठेवी अभय करु ।
जेणे मन होये स्थिरु । साधकाचे ।। ९५।। देहा करी दंडण । स्वये गुरु आपण । जेणे
लागे ध्यान । सर्वोत्तमाचे ।। ९६।। गुरु हा नुरवी पाप । म्हणोनी गुरुचा करावा जप ।

जेणे नुरे पाप । साधकाचे ।। ९७।। गुरुची करिता वारी । गुरु पापाते निवारी । सुधारी तो दुराचारी । असाह्यही ।। ९८।। गुरु वैराग्याचे मूळ । गुरु भक्ति करी प्रांजळ । नुरवी जो मायाजाळ । साधकाचे ।। ९९।। गुरु हा तो पर ब्रह्म । करी साधका निष्काम । नुरवी जो माया भ्रम । भ्रांताचेही ।। १००।। गुरु हा चारी देहांतून । सोडवी साधका आपण । जेणे नुरे पाप-पुण्य । साधकाचे ।। १०१।। गुरु घाली ज्ञानांजन । नुरवी जो पापपुण्य । पाप-पुण्यातील करून । ठेवीतसे ।। १०२।। गुरु दावी निधान । गुरु हा तो परिपूर्ण । नुरवी विषयपण । साधकाचे ।। १०३।। गुरु दावी स्वात्मबोध । साधका होय तोची बोध । तोची हा प्रबोध । भक्तासी गा ।। १०४।। गुरु हाचि स्वये काशी । ठाव देतसे भक्तासी । जेथे पापपुण्यासी । थारा नाही ।। १०५।। स्वये देई तारक मंत्र । जेणे भक्त होये स्वतंत्र । नुरे जेथे परतंत्र । देहाचे गा ।। १०६।। नुरवी जो नेणपण । जाणता आपणाआपण । जेथे नुरे जाणपण । दासरामी ।। १०७।। जोगळेकरा सांगितली परी । दासानुदासे कुसरी । साधीयले श्वासावरी । हनुमंत कृपे ।। १०८।।

।। इति श्रीगुरुमहिमा पूर्णमस्तु।।

।। शुभं भवतु।।